# प्रेस नोट दिनांक २४/०५/२०१९

# विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

# पोलीसांनी आपले पोलीसी कौशल्य वापरुन व-हाडाचे बसमध्ये पडलेली २२,०००/- ची पर्स महिलेस परत मिळवून दिली.

आज दिनांक २०/०२/२०१९ रोजी पो.शि मोरे सँपर्स मार्शल वरील कर्मचारी रात्रपाळी ड्युटीस असताना त्यांना पहाटे ०५/०० वा नियंत्रण कक्षाकडुन दत्तमंदीर इंदीरानगर येरवडा पुणे येथे मदतीचा कॉल प्राप्त झाल्याने त्यांनी लागलीचा चौकी अंमलदार सपोफौज हिले यांचेसह सदर कॉल पॉईंट ठिकाणी पोहचले असता बस नंबर एम.एच.१४ जी.डी.४५७२ हि खाजगी बस उभी होती व आजुबाजुला ३० ते ४० स्त्री पुरुष जमा झालेले दिसले, आम्ही चौकशी केली असता महीला नामे कांचन भिमराव साबळे यांनी सांगितले की, लग्नाचे व-हाड लातुर वरुन आले आहे. मी आमचे सामान खाली उतरवत असताना माझी त्यांची पैशाची पर्स बसच्या शीट वर ठेवली होती व दुसरी बँग वरुन खाली घेत होती, नंतर सीट वरील पर्स घेणेसाठी गेले असता त्यांची पैशाची पर्स त्यांना दिसली नाही.त्या बँगेत माझे २२००० रुपये रोख रक्कम होती,असे सांगितलेने मार्शल वरील पोलीस कर्मचारी यांनी लागलीच गाडीत सगळीकडे शोध घेतला व लोकाना आपआपले बँगांची तपासणी करणेस सांगितले तरी पर्स मिळनू येत नसलेने त्यांनी गाडीतील लोकांना पर्स नजर चुकीने कोणकडे आली असेल किंवा कोणाला मिळाली असेल तर ती परत करा नाहीतर पोलीस कारवाई करु अशी भावनिक समज दिली व काही लोकांची तपासणी सुरु केली असता सदरची पर्स बसचे बाजूला १० ते २० फुट अंतरावर टाकलेली मिळाली ,त्यामधील रोख रक्कम २२,०००/- जसेचेतसे मिळून आलेने रकमेची पर्स सदर महीलेच्या ताब्यात देणेत आली आहे पोलीसांनी अतिशय चातुर्याने लोकांना भावनिक व पोलीसी समज देऊन त्यांची रकमेची पर्स मिळवून दिलेबददल उपस्थितांनी व सदर महिलेने विश्रांतवाडी पोलीसांचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोफौ बन्सीलाल हिले व पो.शि मंगेश मोरे विश्रांतवाडी पोलीस स्टेशन यांनी केली आहे.